# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station लाप्रवि,मुंबई पहिली खबर क्र. FIR No. 33 वर्ष Year 2025 दिनांक Date 16/10/2025

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलमे Sections 7, 7(अ), 12

(ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........

(iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day शुक्रवार तारीख पासून Date from 09/10/25 वेळ Time शेजी ते तारीख पर्यंत Date to 15/10/25 वेळ Time रोजी 17.25 वा

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००

(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date 14/10/2025 वेळ Time 17.45 वा

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 02/2025 तारीख Date 16/10/2025 वेळ Time 05.25 वा

4. माहितीचा प्रकार Type of Information समक्ष लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. 13 किमी चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. उत्तरेस

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name सहेली सायबर कॅफे ठिकाणाचे नंबर No. if any पिझ्झा किंग हॉटेल मागे के पश्चिम वार्ड BMC कार्यालय, अंधेरी (प) मुंबई गल्ली Ward 024, व्ही रोड रस्त्याचे नाव Name of road अंधेरी (प) मुं.

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name कमल सर्जेराव शिंदे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name सर्जेराव शिंदे

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 63 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. 9819106[illegible]

(e) पारपत्र क्रमांक Passport No. — दिल्याचा दिनांक Date of issue — दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation गृहिणी

(g) धर्म Religion ........ जात Caste ........ जनजात Sub-Caste ........

(h) पत्ता Address 11/706, ए विंग गल्ली/सर्व्हे नं. Ward स्नेहकुंड कॉम्प्लेक्स, घर/नाव नं. House Name No. म्हाडा बिल्डिंग फोन/मो. नं. Phone No. पाटलीपुत्र नगर ओशिवरा जोगेश्वरी (प) मुंबई-400102 पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ........ गाव Village ........ पोस्ट Post ........ पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

(1) लोकसेवक अविनाश शांताराम कांबळे, वय-52 वर्षे, अनुज्ञापन निरीक्षक, रा.ठि. D/4, 608, L&T बी 25, सिवूड्स, नवी मुंबई (2) लोकसेवक प्रदिप प्रभाकर संड्याके, वय-34 वर्षे, पद-शिपाई, रा.ठि. रूम नं. 224, माहुल लेबर कॅम्प, मुंबई (3) राजू अर्जुन देठे, वय-44 वर्षे, काम-नोकरी, रा.ठि. रूम नं. 202, B/साई प्रीती बिल्डिंग, ठाणे (प).



Scanned with OKEN Scanner

"फिर्याद"

यातील फिर्यादी श्रीमती कमल सर्जेराव शिंदे यांची स्वतंत्र पानावर फिर्याद नोंद करण्यात आली असुन, तीच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणुन संबोधण्यात येत आहे.

Shinde

कमल सर्जेराव शिंदे

समक्ष

S. B. Sonawane 16/10/25

सुनयना सोनावणे
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई

Scanned with OKEN Scanner

फिर्याद दिनांक १६/१०/२०२५

मी, कमल सर्जेराव शिंदे, वय ६३ वर्षे, व्यवसाय – गृहीणी, ग.ठि. ११/७०६, रोजवुड को.ऑ.हौ. सो., 'ए' विंग, म्हाडा बिल्डिंग, पाटलीपुत्र नगर, ओशिवरा, जोगेश्वरी पश्चिम, मुंबई ४००१०२, मो.नं. ९८१९१०६५९८.

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्त्यावर मागील ०३ वर्षापासून माझे कुटूंबियासह रहावयास आहे. माझे दिवंगत पती सर्जेराव महादेव शिंदे हे महाराष्ट्र पोलीस दलात 'सहाय्यक पोलीस आयुक्त' म्हणून कार्यरत होते. तसेच माझे मालकीचे रामनिवास, कॉस्मोपॉलीटियन शाळेजवळ, एसआरपीएफ कॅम्पचे पाठीमागे, डी.एन. नगर, अंधेरी पश्चिम, मुंबई येथील फुटपाथवर दुकान आहे. सदर दुकान मी लालुराम साळवी यांना ३ वर्षापासुन भाडेतत्वावर दिलेले आहे.

दि.०९/१०/२०२५ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभागाचे लायसन्स इनस्पेक्टर अविनाश कांबळे हे माझे दुकानात आले होते. त्यांनी माझे दुकानाचे लायसन्स तपासले असता, बीएमसी ॲक्ट कलम ३१३ अन्वये लायसन्स नसल्याचे माझे भाडेकरुस सांगितले. त्यावेळी भाडेकरुने मला फोन करुन कळविले की, दि. १०/१०/२०२५ रोजी बीएमसी कार्यालयात कागदपत्रासह अविनाश कांबळे यांनी भेटावयास बोलाविले आहे. त्याप्रमाणे मी दि. १०/१०/२०२५ रोजी बीएमसी कार्यालयात जावुन अविनाश कांबळे यांची भेट घेतली असता, त्यांनी माझेकडे बीएमसी ॲक्ट कलम ३१३ अन्वये परवाना नसल्याचे सांगुन दुकान सुरु ठेवायचे असल्यास २० हजार रुपये लाच दयावी लागेल अन्यथा निष्कासनाची कारवाई करण्यात येईल, असे सांगितले. परंतू मला त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. १४/१०/२०२५ रोजी सायंकाळी १७:५० वाजता ॲन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई या ठिकाणी आले, त्यादरम्यान लायसन्स इनस्पेक्टर अविनाश कांबळे यांचे माझे मोबाईलवर तीन मिसकॉल येवुन गेले होते, परंतु मी ॲन्टी करप्शन ऑफीस येथे असल्याने मी त्यांचे कॉल स्विकारले नाहीत.

त्यानंतर तेथे माझे तक्रारीवर कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक सुनयना सोनावणे, पोलीस निरीक्षक कृष्णा मेखले व पोलीस निरीक्षक दिपिका डंगारणे यांची नेमणूक करण्यात आली. सोनावणे मॅडम यांनी मला बृहन्मुंबई महानगरपालिका, के/पश्चिम विभागाचे लायसन्स इनस्पेक्टर अविनाश कांबळे हे लाचेची मागणी करीत असल्याबाबत लेखी तक्रार अर्ज लिहून देण्यास सांगितले असता, मी तक्रार अर्ज लिहुन दिला. त्यानंतर दोन शासकीय पंचाना बोलाविण्यात आले. सोनावणे मॅडम यांनी दोन पंचांची राजेश आंबेकर व सतीश काथार अशी ओळख करुन दिली. माझा तक्रार अर्ज पंचांना वाचण्यास दिला असता, अर्ज वाचुन दोन पंच, सोनावणे मॅडम व मेखले साहेबांनी सही केली. तो तक्रार अर्ज सोनावणे मॅडम यांनी स्वत:चे ताब्यात ठेवला. त्यानंतर सोनावणे मॅडम यांनी माझे तक्रारीची पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून त्याकरीता करण्यात येणाऱ्या कारवाईची माहिती दिली.

त्यानंतर पडताळणी कारवाईकरीता सोनावणे मॅडम यांचेसोबत मी व दोन्ही पंच ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातील गोपनिय कक्षात गेलो. तेथे लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याकरीता डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये माझे, दोन्ही पंच व सोनावणे मॅडम यांचे वक्तव्य रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतर मी माझा मोबाईल नं. ९८१९१०६५९८ वरून लोकसेवक अविनाश कांबळे यांचे मोबाईल नं. ९६१९६९१५०५ वर १९:४६ वाजता कॉल केला असता, त्यांनी कॉल उचलला नाही. सदर कॉल सोनावणे मॅडम यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर रेकॉर्ड करण्यात आला. त्यानंतर काही वेळ वाट पाहुन सुध्दा लायसन्स इनस्पेक्टर अविनाश कांबळे यांचा कॉल न आल्याने सोनावणे मॅडम यांनी मला दुसऱ्या दिवशी दिनांक १५/१०/२०२५ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात येण्यास सांगितले.

मी दिनांक १५/१०/२०२५ रोजी दुपारी १२:२० वाजता ॲन्टी करप्शन ब्युरो, वरळी, मुंबई या ठिकाणी आले, सोनावणे मॅडम यांनी माझे तक्रारीची पुन्हा पंचासमक्ष पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगून, त्याकरीता करण्यात येणाऱ्या कारवाईची माहिती दिली. तसेच लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याकरीता गोपनीय कक्षात डिजीटल व्हाईस रेकॉर्डरवर माझे, दोन्ही पंच व सोनावणे मॅडम यांचे वक्तव्य रेकॉर्ड करण्यात आले.

Scanned with OKEN Scanner

श्रीमती कमळ राजेराव शिंदे

त्यानंतर पडताळणी कारवाईकरीता सोनावणे मॅडम, मेखले साहेब, डंगारणे मॅडम, मी, दोन्ही पंच व पोलीस पथक दोन पोलीस वाहनातुन बीएमसी, के/वेस्ट विभाग येथे जाण्यास निघालो. दोन्ही पोलीस वाहने कोटेश्वर नगर को.ऑ.हौ.सो., जिवा महाले मार्ग, अंधेरी (पुर्व) चे समोरील रस्त्यालगत थांबविण्यात आली. सोनावणे मॅडम यांनी मी दिलेल्या तक्रारअर्जाच्या अनुषंगाने अविनाश कांबळे यांचे लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याकरीता पोलीस वाहनातच मला तसेच पंचाना सुचना देण्यात आल्या. त्यानंतर पडताळणी कारवाईकरीता माझे ड्रेसचे आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन, पंच आंबेकर यांचेसोबत १४.४२ वाजता बीएमसी ऑफीस, के/वेस्ट विभाग येथे लायसन्स इनस्पेक्टर अविनाश कांबळे यांना भेटण्यास त्यांच्या ५ व्या मजल्यावरील कार्यालयात पाठविण्यात आले. मी पंच आंबेकर यांचेसोबत अविनाश कांबळे यास भेटले असता, त्यांनी माझे दुकानावर निष्कासनाची कारवाई न करण्याकरीता त्यांनी पंचासमक्ष तडजोडीअंती रु. १५,०००/– लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच आंबेकर कोटेश्वर नगर को.ऑ.हौ.सो., जिवा महाले मार्ग, अंधेरी (पुर्व) येथे पोलीस पथकाजवळ परत आले. तेथे माझे व अविनाश कांबळे यांचे प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले व्हाईस रेकॉर्डरमधील रेकॉर्डींग सोनवणे मॅडम, मेखले साहेब व पंचासमक्ष ऐकण्यात आले. त्यामध्ये लायसन्स इनस्पेक्टर अविनाश कांबळे यांनी माझेकडे रु. १५,०००/– लाच मागणी केली असल्याचे सोनावणे मॅडम व मेखले साहेब यांनी मला सांगितले.

लायसन्स इनस्पेक्टर अविनाश कांबळे यांनी तात्काळ लाचेची रक्कम घेवून बोलावले असल्याने सोनावणे मॅडम यांनी मला पुढील सापळापुर्व/सापळा कारवाई सुरू करीत असल्याचे सांगून त्याबाबत माहिती दिली. सोनावणे मॅडम यांनी माझेकडे सापळा कारवाईकरीता आवश्यक रक्कमेची विचारणा केली असता, मी त्यांना माझे बचतीतील सोबत आणलेले रु. १५,०००/– रुपये काढुन दिले. त्यानंतर सोनावणे मॅडम यांनी शासकीय वाहनातच सापळापुर्व कारवाई पुर्ण केली. त्यानंतर सोनावणे मॅडम यांनी मला, पंच व सापळा पथकास सापळा कारवाईबाबत सुचना दिल्या. त्यानंतर माझे ड्रेसचे आतील बाजुस डिजीटल व्हाईस रेकॉर्डर लावुन पंच आंबेकर यांचेसोबत १६:०३ वाजता पुन्हा बीएमसी ऑफीस, के/वेस्ट विभाग येथे लायसन्स इनस्पेक्टर अविनाश कांबळे यांना लाचेची रक्कम रु. १५,०००/– देण्याकरीता पोपटी रंगाच्या कागदी पाकीटामध्ये ठेवुन ते पाकीट माझे पर्स मध्ये ठेवण्यात आले. पोलीस पथक व पंच काथार हे रिक्षाने बीएमसी ऑफीस, के/वेस्ट विभाग येथे जावुन थांबले होते. मी व पंच आंबेकर कांबळे साहेबांच्या ५ व्या मजल्यावरील कार्यालयात गेलो. त्यावेळी कांबळे साहेबांनी आम्हाला बाहेर बसण्यास सांगितले. थोडयावेळाने त्यांचे कार्यालयातील एक इसम माझे जवळ आला व हाताच्या इशाऱ्याने सोबत येण्यास सांगितले. त्यावेळी मी त्याला 'कांबळे साहेब' असे विचारले असता, त्या इसमाने 'हो' म्हणुन उत्तर दिले म्हणुन मी व पंच आंबेकर असे त्याचेसोबत लिफ्टने बिल्डिंगच्या तळमजल्यावर आलो. त्यानंतर त्या इसमाने आम्हांला बीएमसी के/पश्चिम ऑफीसच्या गेटबाहेर येवून काही अंतरावर असलेल्या सहेली सायबर कॅफेमध्ये आणले. तेथे गेल्यानंतर त्या इसमाने सायबर कॅफेमधील एका इसमास 'यांच्याकडे दया' असे सांगीतले. त्यावेळी मी 'कांबळे साहेबांनी हयांच्याकडे दयायला सांगतले का?' असे विचारले असता, त्याने 'हा हा मॅम' म्हणुन सांगितले. त्यावर मी त्यास ' नोटीस परत नाही ना पाठवणार घेवुन सुध्दा' असे विचारले असता, त्याने 'कांबळे साहेबांना फोन करून विचारा' असे सांगितले. मी पुन्हा सदर इसमास ' कांबळे साहेबांनी हयाच इसमाकडे दयायला सांगितले का?' असे विचारले असता, त्याने 'डॉक्युमेन्ट' असे बोलला असता, मी त्यास 'पंधरा हजार' असे विचारले असता, त्याने सायबरमधील इसमास 'दया..' असे सांगितले. त्यानंतर कांबळे साहेबांच्या कार्यालयातील इसम सायबर कॅफे मधुन बाहेर निघुन गेला. त्यावेळी सायबर कॅफेमधील इसमाने मला 'किती आहेत' अशी विचारणा केली असता, 'मी १५ हजार आहेत असे सांगुन कांबळे साहेबांनी मला २० हजार बोलले होते, परंतु मला एवढेच जमणार' असे मी त्यांना सांगितले. तसेच मी सायबर मधील इसमास नोटीस बाबत विचारणा केली असता, त्या इसमाने 'फस्ट नोटीस आहे एवडा इश्यु नाही ते कॅंसल करतील' असे सांगितले. व 'सेकंड नोटीस आली नाही ना' यांची विचारणा केली असता, मी त्यांना 'परत नाही ना येणार व प्रत्येक वर्षी मागणार नाहीत ना' असे विचारले असता, त्या इसमाने 'प्रत्येक वर्षांचा असणार ना मॅडम' असे बोलुन माझेकडुन लाचेची रक्कम स्विकारून त्यांच्या कॉम्प्युटरच्या टेबलजवळ ठेवली.

त्यानंतर मी सायबर कॅफेच्या बाहेर उभ्या असलेल्या पोलीस पथकास दिसले अशारितीने डाव्या हाताचे अंगठयाने 'थम' दाखवुन इशारा केला. लगेचच सापळा पथकामधील अमलदारांनी सायबर कॅफे मधील इसमास ताब्यात घेतले.

त्यानंतर सोनावणे मॅडम सायबर कॅफे मधील इसमास त्याचे पुर्ण नाव विचारले असता, त्याने त्यांचे नाव राजू अर्जुन देठे, धंदा– नोकरी (सहेली सायबर कॅफे, अंधेरी पश्चिम, मुंबई) असे सांगितले. सोनावणे मॅडम यांनी सदर इसमाचे पोलीस पथकाचे मदतीने अंगझडती व सायबर कॅफेची पंचासमक्ष झडती घेतली असता, कॉम्प्युटरच्या टेबलजवळ असलेला लाचेची रक्कम रू. १५,०००/– असलेला लिफाफा सोनवणे मॅडम यांनी पंच काथार यांचे ताब्यात दिला. त्यानंतर सोनावणे मॅडम यांनी कांबळे साहेबांच्या कार्यालयातील इसमास ताब्यात घेतल्याचे सांगुन त्याचे नाव प्रदिप प्रभाकर खंडागळे, असुन तो कांबळे साहेबांच्या कार्यालयातील शिपाई असल्याचे सांगितले. तसेच सोनावणे मॅडम यांनी कांबळे साहेबांना त्यांचे कार्यालयातुन ताब्यात घेतल्याचे सांगितले.

तरी अविनाश शांताराम कांबळे, वय ५२ वर्षे, पद – लायसन्स इनस्पेक्टर, के/पश्चिम विभाग, बृहन्मुंबई महानगरपालिका, अंधेरी पश्चिम, मुंबई यांनी त्यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे वापर करून, स्वतःच्या फायदयाकरीता माझ्या दुकानावर निष्कासनाची कारवाई न करण्यासाठी माझेकडे रू. २०,०००/– लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू. १५,०००/– इतक्या लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले तसेच त्यांचे कार्यालयातील शिपाई प्रदिप प्रभाकर खंडागळे याने सायबर कॅफे मधील इसम नामे राजू अर्जुन देठे यांस लाचेची रक्कम देण्यास सांगुन गुन्हयास प्रोत्साहन दिले व राजू अर्जुन देठे यास लाचेची रक्कम रू. १५,०००/– स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले म्हणून माझी त्या तिघांचे विरोधात तक्रार आहे.

माझा वरील मराठी भाषेतील जबाब मी वाचुन पाहिला असता तो माझे सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष.

S.B.Sonawane

( सुनयना सोनावणे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Shinde

कमल सर्जेराव शिंदे

Scanned with OKEN Scanner

पडताळणी पंचनामा ... /१०/२०२५

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे तक्रार आल्यावरुन गुन्हा दाखल.
Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य स्विकारलेली रक्कम रु. 15,000/-
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ..........
Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.
यातील नमुद तारीख वेळी व ठिकाणी आलोसे क्र. 01 यांनी त्यांच्या पदाचा बेकायदेशीरपणे वापर करुन स्वतः च्या फायद्याकरिता फिर्यादी यांच्या दुकानावर निष्कासनाची कारवाई न करण्यासाठी फिर्यादि यांच्याकडे रु. 20,000/- ची मागणी करुन तडजोडीअंती रु. 15,000/- इतक्या लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले व आलोसे क्र. 02 याने आलोसे क्र. 01 यांनी मागणी केलेली रक्कम लाचेची आहे हे माहित असतानासुद्धा यांच्याकडील खाजगी इसम आरोपी क्र. 03 यांस रक्कम देण्यास सांगुन गुन्ह्यास प्रोत्साहन दिले व आरोपी क्र. 03 खाजगी इसम यांनी लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारली म्हणून आलोसे क्र. 01 व 02 तसेच खाजगी इसम आरोपी क्र. 03 यांच्याविरुद्ध फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन कलम 7, 7(अ), 12, भ्र. प्र. अधि 1988 अन्वये

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या गुन्हा नोंद.
तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : पो. नि. सुनयना सोनावणे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ..........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन .......... जिल्हा .......... राज्य ..........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ..........

(3) Transferred to P. S. ..........
District .......... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name सुनयना सोनावणे

पदनाम Rank पोलिस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ..........

Posting लाप्रवि, मुंबई.

Code No. of I. O. ..........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ..........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत Copy to
1. फिर्यादी. 2. Complainant.
3. पोलीस अधीक्षक ( संगणक ), 3. Supdt. of Police (Computer),
4. तपासिक अंमलदार, 4. Inv. Officer.
5. स्थळ प्रत. 5. Office Copy.

INSPECTOR OF POLICE ANTI CORRUPTION BUREAU MUMBAI

Attachment to item 7 of First Information Report